# सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत,

**ता. सिंदेवाही जिल्हा - चंद्रपूर (म.रा.)**

**स्थापना - दिनांक 25 जानेवारी, 2016**

Email - np.sindewahi@gmail.com दुरध्वनी. क्र. 07178-288080 /288033


क्र./कावि/नपंसि-लो/सा.बां.वि./2025/ ३१८, **दिनांक :- 29/10/2025**

**विषय** :- जनहित याचिका क्र व २०१३/७१.Interim Application (Lodgin) no.29119 of 2025 अंतर्गत मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी रस्त्यावरील खड्याच्य संदर्भात दिलेल्या निर्देशानुसार नगरपंचायतींनी समिती गठीत करणे बाबत

संदर्भ :- 1. मा. उच्च न्यायालय, मुंबई PILNo. 71/2013 या प्रकरणातील दिनांक 13/10/2025 रोजीचे आदेश
2. मा. प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, नागपूर यांचे दिनांक 29/10/2025 रोजी झालेल्या V.C. मधील निर्देश.

आदेश :-

ज्याअर्थी, मा,उच्च न्यायालय. मुंबई यांनी त्यांचे कडील जनहित याचिका क्र. ७१/२०१३ मधील आदेश Interim Application (Lodgin) no.29119 of 2025 (For Intervention) अन्वये आदेश पारित केलेला आहे. त्यामधील दिलेल्या सूचनेनुसार सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत क्षेत्रात रस्तावरील खड्डया बाबत प्राप्त होणा-या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खड्यांमुळे व उघड्या मॅनहोलमुळे अपघात झाल्यास अपघातग्रस्त नागरिकांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समितीची स्थापना करणेबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, जनहित याचिका क्र.७१/२०१३ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशांनुसार अपघात झाल्यास अपघात धारकास किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई देणेकरिता सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायतची गठीत करण्यात आलेली समिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नगरपंचायतची गठीत केलेली समिती यांचे पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| 1 | मुख्याधिकारी, सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत | नोडल अधिकारी |
| 2 | नगरअभियंता सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत | सदस्य |
| 3 | नगर रचना सहाय्यक, सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत | सदस्य |
| 4 | अभियंता, जलदाय व मलनिस्सारण, सिंदेवाही-लोन. न.पं. | सदस्य |
| 5 | उप विभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग सिंदेवाही | सदस्य |
| 6 | उप विभागीय अभियंता, जि.प. (बांध.) उपविभाग मुल | सदस्य |
| 7 | प्रशासकीय अधिकारी, सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत | सदस्य |

तसेच सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत हद्दीतील रस्ते व खड्ड्यांमुळे तसेच खड्यांमुळे व उघड्या मॅनहोलमुळे अपघात झाल्यास अपघातग्रस्त नागरिकांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशांनुसार खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | गठीत केलेली समिती यांचे पद | समिती पदनाम |
| --- | --- | --- |
| 1 | विद्यमान मुख्याधिकारी | सदस्य |
| 2 | विद्यमान सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर | सदस्य |

वरील समिती मधील नोडल अधिकारी व सदस्य यांनी Interim Application (Lodgin) no.29119 of 2025 (For Intervention) आदेशा प्रमाणे कार्यवाही करण्यात यावे.

**मुख्याधिकारी**
**सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत**

**प्रतिलिपी,**

1. मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, सी.बी.डी. बेलापूर नवी मुंबई यांना माहितीस सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, नागपूर विभाग नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
3. मा. जिल्हाधिकारी, नगरपरिषद प्रशासन शाखा, चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.
4. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर यांना माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस सादर.
5. मा. उप विभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग सिंदेवाही / मा. उप विभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग सिंदेवाही यांना माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस सादर.
6. नगरअभियंता / नगर रचना सहाय्यक / अभियंता, जलदाय व मलनिस्सारण/ प्रशासकीय अधिकारी सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत यांना माहितीस तथा उक्त आदेशानुसार कार्यवाहीस अग्रेषीत.

सिंदेवाही-लोनवाही नगर पंचायत
कार्यालय
स्थापना २५ जानेवारी २०१६

**मुख्याधिकारी**
**सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत**